

# भाषेसाठी ज्ञानाचाच बळी द्यायचा का?

रमेश पानसे





# भाषेसाठी ज्ञानाचाच बळी द्यायचा का?

रमेश पानसे

शिक्षणविषयक सारे निर्णय अलीकडे सरकार घेत असते आणि ते सर्व समाजाला कायद्याने अथवा बळजबरीने स्वीकारायला भाग पाडत असते. त्याने अनेक अडचणी उद्‌भवतात. कारण जेव्हा शासन शिक्षणाचे निर्णय घेते तेव्हा, त्याच्यावर सार्वत्रिकतेच्या व दीर्घकालीनतेच्या अशा दोन विचारांचे ओझे असते. सार्वत्रिकता म्हणजे जो निर्णय घ्यायचा तो सर्वांना समानतेने लागू केला पाहिजे अशा विचाराचे असलेले बंधन व दीर्घकालीनता म्हणजे आपण घेतलेला निर्णय हा कायम स्वरुपात टिकणारा असला पाहिजे अथवा असतो, असे मानण्याच्या विचाराचे असलेले बंधन. सरकारातील निर्णयकर्ती माणसे या दोन बंधनांत अडकलेली असतात. त्यांच्या या मर्यादा असतात. त्यामुळे, त्यांना एकदम वेगळा 'जरा हटके' विचार करणे दुरापास्त असते. साहजिकच त्यांच्या विचारांची पठडी बनते आणि पठडीबद्ध विचार नेहमीच प्रश्न सोडविण्यास अडथळा करतो. याचा प्रत्यय आपल्याला मराठी शाळांतून पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याच्या निर्णयाबाबत आला.

हा निर्णय मोठा होता; पण तो सरकारी पठडीत सुरुवातीपासूनच अडकलेला होता. सरकारला मुलांना काही नवे शिकवावे असे वाटले की, लगेच दोन पठडीबद्ध गोष्टी अवलंबल्या जातात. एक म्हणजे, जे काही नवे शिक्षणात आणायचे त्याचे लगेच एका 'शालेय विषया'त रुपांतर करायचे. म्हणजे एक नवा विषय शिक्षणात आणायचा. तसा इंग्रजी हा 'विषय' पहिलीपासूनच अभ्यासक्रमात आणला गेला. दुसरी गोष्ट अशी की, विषय हा नेहमीच क्रमिक पुस्तकाद्वारे शिकविला पाहिजे, असे पठडीबद्ध सरकारी शिक्षणकर्मचाऱ्याला वाटते. मग सरकारने अशी मुलांना इंग्रजी शिकण्यासाठीची क्रमिक पुस्तके तयार केली. या साऱ्या खटाटोपातील प्रमुख अडचण अशा आहे की, 'भाषा' हा 'विषय'च असा आहे की तो क्रमिक पुस्तकात येऊन बसतच नाही. कारण तो क्रमिक पुस्तकात मावतच नाही. फार तर इतके असू शकते की शिक्षकांसाठी इंग्रजी शिकविण्यासाठी एखादे क्रमिक पुस्तक करता येईल. परंतु मुलांच्या शिकण्यासाठी मात्र खासच नव्हे!

## भाषा आत्मसात करणे

भाषा आत्मसात करणे ही गोष्ट नेहमीच क्रमिक पुस्तकाशी असंबंधित अशी आहे; ती क्रमिक पुस्तकांच्या बाहेरील वास्तव जगातील क्रिया-प्रतिक्रियांतून घडून येणारी अशी प्रक्रिया आहे. भाषा ही वातावरणात असावी लागते मग ती, मुले आपल्या भाषा-इंद्रियांनी आत्मसात करू शकतात. क्रमिक पुस्तकातून माहिती जरूर देता येते; पण भाषा आत्मसात करण्यासाठी लागणारे भाषानुभव मात्र कदापीही देता येत नाहीत. शालेय शिक्षकांसाठी एखादे क्रमिक पुस्तक तयार करून, मुलांच्या शिकण्यासाठी (मुलांना 'शिकविण्या'साठी नव्हे!) वातावरणनिर्मिती कशी असावी, कृत्रिमरित्या ती कशी करावी, भाषानुभव कस कसे द्यावेत याचे धडे त्यांना देता येतील; द्यावेत. भाषा शिकण्याच्या दोनच पद्धती उपलब्ध आहेत. एक, परिसरातून भाषा आत्मसात करणे आणि दोन, एका भाषेकरवी दुसरी भाषा शिकणे. तिसरा पर्याय उपलब्ध दिसत नाही. संगणकाचा वगैरे वापर करून दुसऱ्या प्रकारच्या भाषा शिक्षणाला काहीसा उपयोग होऊ शकेल पण, आज तरी तो पहिल्या म्हणजे नैसर्गिकरित्या भाषा आत्मसात करण्याच्या प्रक्रियेत फारसा उपयोगी नाही. क्रमिक पुस्तकाकरवी भाषा शिकणे हेही दुसऱ्या म्हणजे, एका भाषेकरवी दुसरी भाषा शिकण्याच्या प्रयत्नांना उपयोगी ठरू शकेल; पण तो पहिल्या पद्धतीचा पर्याय होऊ शकत नाही.


भाषा ही, जगात साठलेली माहिती मुलांच्या मेंदूत भरण्याची बाब नाही; तर ते यासाठीचे साधन आहे. श्वास जसा दुसऱ्याला भरवता येत नाही, मूल्ये जशी तथाकथित सुविचारांतून श्लोक,

पाठांतरांतून रुजविता येत नाहीत, तशी भाषा ही सुद्धा क्रमिक पुस्तकांतून शिकविता येत नाही. असे का असते, हे 'भाषे'ची वैशिष्ट्ये पाहिल्यास लक्षात येईल.

## भाषेची वैशिष्ट्ये

मला आढळलेली भाषेची सात वैशिष्ट्ये आहेत. (अजूनही कदाचित सापडतील). भाषा ही या सर्व वैशिष्ट्यांनी घडलेला घडा आहे आणि तो ज्याला-त्याला आपला आपणच घडवावा लागतो. परिसराच्या चक्रावरच हा घडा घडत जातो; भाषानुभवांची माती मळूनच तो घडत असतो. एकदा का हा घडा पक्का तयार झाला की मग त्याच्यातून कुठल्याही विषयाची माहिती भरून घेता येते. इतकेच नव्हे तर दुसरी कोणतीही भाषा शिकून घेता येते.

भाषेची ही वैशिष्ट्ये येथे क्रमाने सांगितली असली तरी त्यात प्राधान्य वा क्रमवारिता नाही, हे लक्षात घ्यायला हवे. या सर्वच धाग्यांनी, एकाचवेळी, भाषेचा पोत विणला जातो.




१. **रचनाबद्धता** (Structured) – रचनाबद्धता हे भाषेचे पहिले वैशिष्ट्य आहे. प्रत्येक भाषेचे एक विशिष्ट असे 'रूप' असते. भाषेची ही रचना किंवा संरचना (structure) ही व्याकरणाच्या पायाभूत घटकांनी तयार झालेली असते. ध्वनी किंवा स्वनिम, (Phonemes) अक्षरोच्चार, शब्दोच्चार, शब्दव्यवस्था व वाक्यव्यवस्था (Syntax) इत्यादी घटकांनी भाषेची संरचना घडलेली असते. स्वतःच्या भाषाशिक्षणात, लहान वयातच मुले ही संरचना पायरी-पायरीने आत्मसात करीत जातात.

२. **अर्थात्मकता** (Semantics) – भाषा रचनेचा मुख्य उद्देश असतो तो भाषेतील अर्थ स्पष्टतेचा. शब्द आणि वाक्ये हे भाषाघटक काही 'अर्थ' घेऊन येतात. आपण शब्दोच्चार केल्याने किंवा वाक्योच्चार केल्याने त्यातील अर्थ दुसऱ्याला (आणि स्वतःलाही) कळतो. लहान वयात, भाषा आत्मसात करताना मुले शब्दोच्चार व त्यांचा अर्थ यांची सांगड घालत जातात. मुले आपल्या स्मृतीत ठेवीत असलेला शब्दसंग्रह हा अर्थपूर्ण शब्दांचाच असतो.

३. **रचनांतरणता** (Transformation) – एका प्रकारची वाक्यरचना आत्मसात झाली की मुले स्वतःच्याच क्षमतेने तशाच प्रकारच्या दुसऱ्या वाक्यरचना करू शकतात. शिवाय एका तऱ्हेने, एका परिस्थितीत अवगत केलेली भाषारचना, दुसऱ्या तऱ्हेने, दुसऱ्या परिस्थितीत आवश्यक ते बदल करून वापरू शकतात. मुलांना अशा प्रकारच्या रचनांतरणाच्या संधी, शिक्षक, पालक, जाणीवपूर्वक देऊ शकतात.

४. **संदर्भाधीनता** (Referential) – भाषेच्या प्रत्येक वापराला काही ना काही संदर्भ असतो. तो व्यक्तींचा, घटनांचा, वस्तूंचा किंवा संकल्पना, कल्पना व विचारांचा असू शकतो; तसाच तो विशिष्ट काळाचाही असू शकतो. संदर्भाने अर्थनिश्चितीकरण तर होतेच; पण त्याचबरोबर गोष्टी स्मृतीत राहायलाही मदत होते.

५. **आंतरव्यक्तीता** (Interpersonal) – भाषेचा बराच व्यावहारिक वापर हा दोन वा अनेक व्यक्तींमधील संवादासाठी असतो. इतरांशी संपर्क, सल्लामसलत, भाषण–संभाषण अशा अनेक गोष्टींसाठी होणारा भाषेचा वापर हा मूलत; व्यक्ती–व्यक्तींमधील संवाद साधण्याचाच असतो. यांमधील भाषावापराची विविध वळणे, मुले, इतरांच्या संपर्कात शिकत जातात. याबाबतींतले कित्येक संकेत त्यांच्या अंगवळणी पडतात.

६. **व्यक्तीअंतर्गतता** (Intrapersonal) – भाषेचे 'बाह्य' कार्य जेवढे महत्त्वाचे असते तेवढेच 'अंतर्गत' कार्यही महत्त्वाचे असते. शब्दांच्या, अर्थांच्या, आशयांच्या मानसप्रतिमा निर्माण करणे, स्मृतीबध्द करणे, विचार करणे, मनन–चिंतन करणे, अभिव्यक्तीसाठी विचारांचे–वाक्यांचे संघटन करणे, कल्पना करणे अशी भाषेची अंतर्गत कार्येच प्रत्येक माणसाचे 'मी' त्व धडवीत असतात. या कार्यांसाठी खास करून भाषिक अनुभव मिळण्याची गरज असते.

७. **सर्जनशीलता** (Creativity) – भाषेचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे, भाषा एकदा आत्मसात झाली की, तिचा विविधांगी सर्जनशील वापर करता येतो. वाङ्.मय निर्मिती हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. भाषा बदलते, वेगवेगळी वळणे घेते, नवे नवे उपयोग निर्माण

करते, हे सारे, शक्य होते ते भाषेच्या अंतर्गत जीवंतपणामुळे. व्यक्तिगत पातळीवर भाषेची ही जीवंतता टिकविणे हे लहान वयातच, या सर्वांगांनी, तिच्या उपयोग करीत राहण्यावर अवलंबून असते.

ही विविध वैशिष्ट्ये लक्षात घेतली तर भाषा हे अनेक पाकळ्यांचे एक फूल आहे हे जाणवेल. भाषा-फुलाचे अस्तित्व असते तेच मुळी या सर्व पाकळ्या एकाच वेळी पेलून धरण्यामुळे.

मुलांच्या भाषा शिक्षणाविषयी आपण विचार करणार असू तर हे , सर्व पाकळ्यांसहित फुललेले फूल मुलांच्या पदरी पडेल याची दखल आपल्याला घ्यावी लागेल. त्याला एखादीच पाकळी मिळून चालणार नाही, किंवा असेही चालणार नाही की, एक पाकळी आज आणि मग काही काळाने दुसरी, नंतर तिसरी; कारण, पुढची पाकळी मिळेपर्यंत मागची सुकून जायची वेळ येईल. त्यामुळेच, लहान मुलांच्या भाषा शिक्षणात विविधांगी भाषानुभव एकसंघपणे प्राप्त होण्याचे महत्त्व विशेष असते. सारे भाषाशिक्षण त्यासाठी अशा प्रकारच्या भाषानुभवांवर बेतावे लागते.

## भाषानुभव

अनुभवा' ची एक खासियत असते. अनुभव घेणारा हा त्या अनुभवप्रक्रियेत स्वतः सहभागी होत असतो. ह्या स्वतः सहभागी होण्याचे स्वरूप हे 'शरीरशास्त्रीय' स्वरूप असते. म्हणजे असे की, मन (म्हणजे मेंदू) आणि शरीर दोन्हीही एकदमच अनुभव घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी होत असतात. (यालाच आपण 'सर्वांगाने अनुभव घेणे' असे म्हणू शकतो!) तन-मनाने शिकणे हेच परिणामकारक शिकणे असते.

मुलांच्या बाबतीत भाषा सर्वांगाने आत्मसात व्हायची असेल तर ती स्वानुभवातूनच यावी लागते. उपजत भाषिक क्षमतांना प्रेरित करीत जाणे, हे अनुभवांचे काम असते. हे कार्य मेंदूच्या पातळीवर होत असते. मेंदूमध्ये असलेल्या 'भाषाक्षेत्रा' मध्ये असलेल्या असंख्य पेशी उद्दिपीत होणे, त्यांना नव्या वृक्षिका फुटणे, आधीच्या ज्ञानावर नव्या ज्ञानाच्या विटा रचल्या जाऊन भाषाज्ञान अधिक विकसित होणे व ते सारे दीर्घकालीन स्मृतिकोशात जाऊन बसणे या सगळ्या क्रिया व त्यातील अनेक रासायनिक उपक्रिया घडून भाषा आत्मसात होत असते. भाषानुभवांकडून भाषाज्ञानाकडे असा होणारा हा प्रवास नैसर्गिकरित्या पहिल्या आत्मसात केलेल्या भाषेकरवी होत असतो. भाषा सर्वांगांनी आकळून घेणे, त्यासाठी विविधांगी भाषानुभव घेणे आणि त्यांकरवी मेंदूपातळीवर भाषाज्ञानाची इमारत रचली जाणे असा तीन टप्प्यांचा हा प्रवास असतो. हा प्रवास सुकरतेने होणे म्हणजे भाषाशिक्षण होय !

## भाषा शिक्षणाचा शालेय व्यवहार

या तात्त्विक चर्चेकडून आता भाषाशिक्षणाच्या शालेय व्यवहारांकडे वळले तर काय आढळते?

१. मुळात भाषाशिक्षण हे आजवर शालेय स्तरावर महत्त्वाचे मानले गेले नाही. त्याकडे अजूनही मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष आहे.

२. अलीकडे, बहुसंख्य पालकांचा ओढा, आपल्या पाल्यांच्या शिक्षणाबाबत इंग्रजी माध्यमाकडे आहे; हे वास्तव नाकारून चालणार नाही.

३. मराठी माध्यमांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरेशी इंग्रजी भाषा आत्मसात होत नाही, हेही वास्तव आपण नाकारून चालणार नाही.

४. मराठी माध्यमातील मुलांना 'सेमी-इंग्रजी' चा पर्याय दिल्यामुळे त्यांना, इंग्रजी माध्यमातील मुलांप्रमाणे इंग्रजी बोलता येईल, व्यवहार वापराचे इंग्रजी येईल अशी जी पालकांची समजूत करवून दिली जात आहे, तो शुध्द भ्रम आहे, हेही वास्तव लक्षात घ्यायला हवे.

खरे तर या सर्व वास्तव घटनांमुळे, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे. पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. वरील तीन वास्तवे, परस्परांना पर्याय आहेत, असे जे सामान्यपणे मानले जात आहे, त्यातून ही प्रश्न सुटणार नाही. शालेय शिक्षणातील भाषाविषयक पेच सोडविण्यासाठी काही वेगळ्या दिशेने वाटचाल करावी लागेल असे वाटते.

प्रथमतः हे पक्के लक्षात घ्यायला हवे की, शालेय शिक्षणाचा उद्देश, इंग्रजी येणे वा मराठी येणे असा नाही. सरकारने प्रसृत केलेल्या शिक्षणाच्या उद्दिष्टांतही तसे म्हटलेले नाही. शिक्षणाचा उद्देश मूलतः ज्ञानप्राप्ती असा असून भाषा,(म्हणजे मराठी,इंग्रजी वा अन्य भाषा) हे या उद्दिष्टपूर्तीचे साधन आहे. या साध्य-साधनाची गल्लत झाल्यामुळे पालकांची अवस्था संभ्रमित आहे असे म्हणता येईल. ज्ञानप्राप्ती हे साध्य आणि भाषा हे या प्रक्रियेचे साधन आहे असे लक्षात घेतले की भाषेचे शिक्षणातील स्थान हे साधनभूत म्हणून दुय्यम आहे हे कळेल. अर्थात दुय्यम आहे म्हणजे ते महत्त्वाचे नाही, असे येथे सुचविलेले नाही.

साध्य-साधनाची निश्चिती झाली की मग त्यांच्या एकत्रिकरणांतून तीन पर्याय उपलब्ध होतात.

१. ज्ञानप्राप्ती + इंग्रजी चांगले येणे.

२. ज्ञानप्राप्ती + मराठी चांगले येणे.

३. ज्ञानप्राप्ती + मराठी चांगले येणे + इंग्रजी चांगले येणे.

असे पर्याय दिले तर कुणीही सूज्ञ माणूस तिसरा पर्याय निवडेल हे उघडच आहे.

आपण पहिल्या पर्यायाचा जरा खोलवर विचार करू या.

## इंग्रजीतून शिक्षण

इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेत जेव्हा मराठी मुले प्रवेश घेतात, तेव्हा त्यांना नैसर्गिकतेने पहिली भाषा अवगत असल्यामुळे, मराठी चांगले येत असते. आता ती मुले प्रथमतःच इंग्रजीच्या प्रांगणात प्रवेश करीत असतात. येथे, इंग्रजी भाषेचा शालेय शिक्षणातील ज्ञानप्राप्तीचे एक साधन म्हणून त्यांना वापर करायचा असतो. म्हणजे मुलांना एकाच वेळी दोन गोष्टी करायच्या असतात. एक, ज्ञानप्राप्ती तर करायची असतेच पण, त्याचबरोबर ज्ञानप्राप्तीचे माध्यमही शिकून घ्यायचे असते. या गोष्टीकडे बारकाईने पाहिले तर, शिकणाऱ्या मुलांच्या संदर्भातील काही बाबींची नोंद आपल्याला घेता येईल. एक, एकाच वेळी ज्ञान मिळविणे व ते मिळविण्याचे साधन म्हणजे इंग्रजी भाषा शिकणे या दोन गोष्टी एकदमच शिकण्याचा जबरदस्त ताण, आणि तोही लहान वयांत, मुलांना पेलावा लागतो. (त्याचा त्यांच्या आरोग्यावरही अनिष्ट परिणाम होत असतो.) दोन, त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत माध्यमाच्या अडचणीमुळे सहजता राहत नाही; साहजिकच त्याचा 'आकलन बोजा' (cognitive load) मुलांवर पडतो. हाही एक ताणच असतो. तिसरा, नकळत घडून येणारा परिणाम अधिक गंभीर असतो. इंग्रजी भाषेतून शिक्षणाची सुरूवात करताना, पुरेशी माध्यम-भाषा येत नाही, तोवर विषयांचे आकलन कच्चे राहते. ज्ञानप्राप्तीच्या मार्गावर सुरूवातीलाच विद्यार्थ्यांना हा खडतर प्रवास करावा लागतो. ज्ञानप्राप्तीसाठी शाळेत प्रवेश घ्यायचा, पण, ज्ञानप्राप्तीचा मुलांचा मार्गच खडतर करून ठेवायचा अशी काहीशी विसंगत कृती आपल्याकडून होते आहे, याचे भान सर्वांनी ठेवावयास हवे. इंग्रजी माध्यमातून शिकू पाहणाऱ्या मुलांच्या अडचणी येथे संपत नाहीत.

पुढे जेव्हा, म्हणजे साधारणपणे पाचवीपासून पुढे शालेय विषय शिकण्याला पुरेशी इंग्रजी भाषा येऊ लागते, तेव्हा मुले, शिक्षणव्यवस्थेत वरच्या स्तरावर पोचलेली असतात. वेगवेगळ्या विषयांमधील वरच्या दर्जाचा आशय समजावून घेत असतात. नवे काही आकलन करून घेत असतात. अशावेळी, हे नवे आकलन त्यांना इंग्रजी भाषेच्या कक्षेत आणता येते. परंतु केवळ ज्ञानप्राप्तीच्या संदर्भात वेगळीच अडचण उपस्थित झालेली असते. विषयांचे आकलन किंवा ज्ञानप्राप्ती ही पायरी-पायरीने, इमारत बांधणीसाठी विटांवर विटा रचाव्यात अशी होत असते. इंग्रजी माध्यमातील मराठी मुलांच्या बाबतीत, सुरूवातीचे किंवा आधीचे विषय आकलन- विषयांमधील संकल्पनात्मक आकलन - हे कच्च्या भाषेच्या सहाय्याने झालेले असल्यामुळे ते

सामान्यपणे, अर्धवट झालेले असते; नीट झालेले नसते. नवे ज्ञान हे नेहमीच आधीच्या म्हणजे पूर्वज्ञानाशी जोडून येत असते. त्यामुळे आता अडचण अशी निर्माण होते की, इंग्रजी माध्यमातील मराठी मुलांना, ज्ञानाच्या आधीच्या कच्च्या बांधकामावर नंतरचे पक्के बांधकाम करण्याची वेळ येते. त्यामुळे ज्ञानाची पक्की इमारत, त्यांच्याकडून बांधली जाणे दुरापास्तच होते, परिणाम असा होतो की, ही मुले भाषेसाठी ज्ञानाचाच बळी देतात; आणि मग भाषेच्या आशयाला तर ती मुकतातच, पण शिक्षणाचा 'ज्ञान' हा मूळ हेतूच काही प्रमाणात मारला जातो.

## मराठीतून शिक्षण

मराठी मुलांनी मराठी माध्यमातून आपले शालेय शिक्षण घेतले तर मात्र अशी अडचणीची परिस्थिती निर्माण होत नाही. शाळेत प्रवेश करण्यापूर्वीच त्यांनी मराठी भाषा पुरेशी अवगत केलेली असते. त्यामुळे ज्ञानप्राप्तीचे त्यांचे काम, शाळेच्या औपचारिक शिक्षणव्यवस्थेत, सामान्यपणे अगदी विनासायास सुरू होते. ज्ञानप्राप्ती आणि ज्ञानप्राप्तीसाठी साधनप्राप्ती असे दुहेरी ताण त्यांना पेलावे लागत नाहीत. उलट एक नवाच फायदा त्यांना मिळतो, की जो इंग्रजी माध्यमातून शिकू पाहणाऱ्या मराठी मुलांना मिळणे शक्य नसते. हा फायदा असतो, भाषिक समृध्दीचा. भाषिक क्षमतांची बहुतांशी पूर्तता आपोआपच झाल्यानंतर मुले जेव्हा मराठी शाळेत शिकू लागतात, तेव्हा त्यांच्या विषय शिकण्याच्या बरोबरीने त्यांची मराठी भाषाही अधिक समृध्द होत जाते. आणि निदान एका भाषेची समृध्दी ही माणसाच्या सामाजिक जीवनाची किमान गरज असते. अर्थातच इंग्रजी माध्यमातील मुले यांपासून कायमची वंचित राहतात.

भाषा शिक्षणाविषयीचा एक वेगळाच मुद्दाही विचारांत घ्यायला हवा. इंग्रजी ही जेव्हा आपली पहिली आत्मसात झालेली भाषा नसते, तेव्हा ती शिकणे हे, एका भाषेकरवी दुसरी भाषा शिकणे, या स्वरूपाचे असते. माणसाला कुठलीही एक भाषा पक्की येत असेल तर तिच्याकरवी, दुसरी कोणतीही भाषा शिकता येते. त्यामुळेच, मराठी भाषा पक्की असली तर इंग्रजी भाषा शिकणे फारसे कठीण नसते. परंतु इंग्रजी माध्यमाच्या बहुतेक शाळांतून अशी प्रथा अवलंबिली जाते की, मुलांना इथून पुढे इंग्रजीतून शिकायचे असल्यामुळे त्यांनी मराठीचा वापर व्यवहारात करता कामा नये. याचा परिणाम असा होतो की, त्यांची पहिल्या भाषेच्या समृध्दीची वाट थबकते. साहजिकच कुठलीही नवी भाषा शिकण्याचे एक साधनच कमकुवत राहते. अशी मुले पुढे आयुष्यभर 'इंग्रजाळलेली मराठी' बोलतात. ज्ञानभाषा म्हणून त्यांची कोणतीच भाषा समृध्द होत नाही; गरज निर्माण झाली तर नव्या वेगळ्या भाषा शिकण्यातही अडचण येऊ शकते.

पहिली समृध्द भाषा ही आपली ज्ञानभाषा असते, कारण ती आपली विचाराची-मननाची नि चिंतनाची भाषा असते. बाहेरून ज्ञानेंद्रियांकरवी मिळणाऱ्या माहितीचे रूपांतर जेव्हा स्वतःच्या ज्ञानात केले जाते, तेव्हा अपरिहार्यपणे आपण विचार-मनन-चिंतन या साधनांचा आश्रय घेत असतो; आणि समृध्द भाषा हा तिचा पाया असतो.

हे सगळे तात्त्विक विवेचन लक्षात घेतले तर निष्कर्ष असा निघतो की, प्रत्येक माणसालाच एका तरी समृध्द भाषेची गरज असते. परंतु, इंग्रजी माध्यमातून शालेय शिक्षणाकडे वळणारी मुले त्यांची मराठी भाषा समृध्द करण्याची संधी गमावतात आणि इंग्रजी भाषा समृध्द करण्याची ताकद कमावतातच असे नाही. एकही भाषा समृध्द होत नाही, आणि हाती पडते ती मात्र गल्लत भाषा !

याचा अर्थ असा की, 'ज्ञानप्राप्ती + इंग्रजी' हा पर्याय दोन्ही शैक्षणिक घटक म्हणजे ज्ञान व भाषा कमकुवत ठेवत असल्यामुळे या पर्यायापेक्षा 'ज्ञानप्राप्ती + मराठी' हा दोन्ही घटक समृध्द करणारा पर्याय खासच उजवा ठरतो. परंतु स्पष्टता झाली तरी प्रश्न सुटत नाही.

## द्विभाषा समृधी

गरज असो वा नसो, लोकांना इंग्रजी भाषेचा गंड निर्माण झाला आहे हे वास्तव आहेच, आणि त्याचे समाधान होण्याची गरज आहेच. म्हणजेच आपल्याला, तिसऱ्या पर्यायाकडे, म्हणजे 'ज्ञानप्राप्ती + मराठी चांगले येणे + इंग्रजी चांगले येणे' याकडेच जायला हवे. व्यवहारातील याचा अर्थ असा की, मराठी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांना इंग्रजी भाषेचेही उत्तम बाळकडू मिळायला हवे. हे घडणे शक्य आहे, हे लोकांना कळले पाहिजे, पटले पाहिजे, त्यासाठी प्रथमतः त्यांनी त्यांचा एक गैरसमज ठामपणे मनातून काढून टाकला पाहिजे. तो म्हणजे, इंग्रजी शिकायचे तर इंग्रजीतूनच सारे काही शिकले पाहिजे असे वाटणे. ' इंग्रजी शिकणे ' आणि 'इंग्रजीतून शिकणे' या दोन वेगळ्या गोष्टी असून मुलांनी इंग्रजीतून शिकण्याचे ओझे न बाळगता इंग्रजी शिकायला मिळाले तर ते सोन्याहून पिवळे ठरेल !

पुढील पायऱ्या घेऊन हे घडविता येईल असे वाटते.

१. शिक्षणात सर्वात महत्त्वाची असते ती ज्ञानप्राप्ती. ज्ञानप्राप्तीच्या प्रक्रियेत विषयांचे आकलन कच्चे राहून चालणार नाही हे उघडच आहे. त्यातही प्राथमिक स्तरावरचे सुरूवातीचे शिक्षण हे पुढील शिक्षणाचा पाया असतो, म्हणून आकलन पातळीवर ते पक्केच असायला हवे. त्यामुळे, सुरूवातीच्या काळातील सारे शिक्षण, पुरेशा प्रमाणात येत असलेल्या मराठी भाषेतूनच मराठी मुलांनी घ्यावयाचे. यातून दोन गोष्टी घडून येतील. एक म्हणजे, मुलांचे

ज्ञानप्राप्तीचे काम ताणविरहित व विनासायास व परिपूर्णतेने चालू राहील, दोन, मुलांची पहिली भाषा जी मराठी ती, याच भाषेतून विविध विषयांचे शिक्षण चालू ठेवल्याने अधिक समृध्द होत जाईल.

२. इंग्रजी भाषा, आजवर शाळांतून शिकविली जात आहे तशी क्रमिक पुस्तकातून, प्रश्नोत्तरे पाठ करून, केवळ लिहून–वाचून शिकायची नाही; तर ती ज्या नैसर्गिक पध्दतीने मराठी ही पहिली भाषा अवगत केली गेली त्याच पध्दतीने शिकायची असते. माणसाच्या नैसर्गिक क्षमतांचा वापर होऊन येणारी पहिली भाषा ही नेहमीच इतरांकडून भरपूर ऐकून, ऐकलेल्याचा आपला आपण अर्थ लावून, अर्थपूर्ण शब्दांचा संग्रह स्मृतीत साठवून आणि इतरांसाठी बोलून भाषेची अभिव्यक्ती करत करतच सर्वांना आत्मसात होते. हीच पध्दत इंग्रजीसाठीही वापरता येणे शक्य आहे. त्यासाठी क्रमिक पुस्तके नव्हे तर क्रमवार कार्यक्रम आखावा लागेल. मुलांना भरपूर बोलण्या–ऐकण्याच्या संधी द्याव्या लागतील.

यातही एक क्रमवारी आहे. आधी भाषा ऐकून 'समजणे' ही गोष्ट येते, 'बोलणे' मग येते.

भाषा ऐकून समजणे ही मेंदूच्या पातळीवर घडून येणारी खूप गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. भाषा 'ऐकणे', आणि भाषा 'समजणे' या दोन अगदी भिन्न गोष्टी आहेत. कानांच्या सहाय्याने बाह्य जगातील भाषा ' ऐकली' जाते. शब्दोच्चार, वाक्योच्चार कानावर पडतात. परंतु मेंदूत त्यांचा अर्थ लावल्याशिवाय ' समजण्या' ची क्रिया घडून येत नाही. हे अर्थ लावणे, व्यक्तीचे स्वनिर्मितीचे काम असते. गंमत अशी की, ही अर्थ लावण्याची प्रक्रिया जन्मापासूनच चालू होते. बालकांचे काहीतरी उच्चार तोंडावाटे करून बोलण्याचे काम सुरू होते. ते एक ते सव्वा वयवर्षापासून. तोपर्यंतचा काळ हा बालकाच्या आयुष्यातील अबोलतेचा काळ असतो. मात्र या काळात भाषा ऐकण्याचे आणि त्याच्या अर्थनिश्चितीचे काम अतिशय वेगाने चालूच असते. शब्दध्वनी, शब्दोच्चाररीती (accents) व्याकरणीय रचना आणि शब्दार्थ यांचे एकत्रित असे आकृतिबंध बालकाच्या मानसपातळीवर तयार होत जातात. यातून ' भाषातनू' म्हणजे भाषेची शरीराकृती आकळून घेतली जात असते. भाषा अशा तऱ्हेने अंगभूत होत असते. किंबहुना ही पूर्वतयारी झाल्याशिवाय मुले बोलायला लागत नाहीत.

भाषा समजावून घेण्याच्या प्रक्रियेला पुरेसा वेळही द्यावा लागतो. कारण, ऐकलेली भाषा मनात घोळली जाते, ही पुन्हा पुन्हा घडणारी घोळण्याची क्रिया वेळ घेऊनच होत असते. मुले बोलायला लागल्यानंतर एखादा शब्द समजावून घेताना 'याला काय म्हणतात?' ' हे काय आहे?' असे पुन्हा पुन्हा विचारतात. तेव्हा सुध्दा या शाब्दिक कृतीतून शब्द मनामध्ये पुन्हा पुन्हा घोळून तो आत्मसात करण्याचेच काम चालत असते.

थोडक्यात असे की, भाषा शिकण्याच्या नैसर्गिकतेशी इमान राखून इंग्रजी भाषा, एक दुसरी भाषा म्हणून शिकायची असेल तर पुढील पायऱ्यांनी शिकता येईल.

१. अगदी बालपणापासून मुलांना मराठी भाषेबरोबरच, भरपूर इंग्रजी भाषा (व्याकरणासहित) ऐकायला मिळणे, बडबडगीतांपासून ते गोष्टी ते संभाषण–भाषणांपर्यंत ऐकायला मिळणे आवश्यक आहे. इंग्रजी भाषा येणाऱ्याच्या सहवासात राहायला मिळाले तर उत्तमच. आजच्या तंत्रयुगात सीडींचा उपयोग करून घेता येईल. कुटुंबाप्रमाणेच शाळांनाही हे करता येईल.

२. ऐकलेल्या इंग्रजीवर मनन करणे – मनात भाषा घोळवणे व यासाठी पुरेसा वेळ देणे. प्रत्यक्ष शिकण्याच्या वेळेपेक्षा अन्य वेळात, आपण जे शिकतो त्याची मनात उजळणी करणे, मनातल्या मनात अन्य व्यक्तींशी संभाषण करणे, नव्याने वाक्ये रचून पाहणे असा ' अंतर्गत अभ्यास' करण्याची पायरी घेणे, त्याची सवय लागणे, ही गोष्ट भाषा अंगभूत करण्यासाठी खूपच उपयुक्त आहे. ऐकणे आणि बोलणे या दोन पायऱ्यांमधील, भाषा समजावून घेण्याची जी पायरी आहे, ती पक्की होण्यासाठी भाषा मनामध्ये घोळण्याची पायरी उपयोगी आहे.

३. तिसरी पायरी आहे ती ती प्रत्यक्ष बोलण्याची. भाषा ऐकणे, अर्थाने समजावून घेणे आणि भाषा मनात घोळणे या तीन पायऱ्यांची पूर्वतयारी झाली की, भाषा बोलता येणे फारसे कठीण नसते. विशेषतः ऐकून, मनाच्या कोशामध्ये जमलेला शब्दसंग्रह आणि व्याकरणयुक्त भाषारचना यांचाच वापर करून भाषा बोलली जात असते. शिवाय भाषा मनात घोळताना, आपण मनातल्या मनात भाषा ' बोलत' च असतो. त्यामुळे त्याचे मौखिक बोलण्यात प्रकटीकरण सहज होते. मुले इंग्रजी बोलू लागतात.

## इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास

मुलांना इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास हा इंग्रजी बोलण्याच्या प्रयत्नांतूनच येत असतो. बिनदिक्कत चुका करत, सारख्या चुका दुरूस्त न करताही, सतत बोलत गेल्यास भाषा बोलण्याचा आत्मविश्वास दुणावतो. मात्र सारख्या चुका काढणे, त्या दुरूस्त करणे याचा उलटाच परिणाम होऊन आत्मविश्वास कमी होतो. त्यासाठी मुलांनी भाषेशी खेळले पाहिजे. उलटसुलट भाषा वापरून पाहिली पाहिजे. थोडे बहुत जरी इंग्रजी बोलता येऊ लागले की, इंग्रजी बोलण्याची आवड निर्माण होऊ लागते. इतरांच्या बोलण्यातल्या भाषिक लकबींकडे लक्ष जाऊ लागते. आपल्याला जे काही म्हणायचे आहे त्याची अभिव्यक्ती इंग्रजीतूनच करावी अशी इच्छा होऊ लागते. या साऱ्यातून इंग्रजीशी सलगी वाढू लागते.

मुलांना इंग्रजी बऱ्यापैकी बोलता येऊ लागले की, भाषेच्या प्रगतीच्या पुढच्या पायऱ्या घेणे फारसे कठीण नसते. लेखन–वाचनाची कौशल्ये अधिक सहजतेने अंगवळणी पडतात. पुढे पुढे तर या भाषेकरवीही, पहिल्या मराठी भाषेप्रमाणेच, पण स्वतंत्रपणे, आधीच्या ज्ञानाच्या आधारावर नव्या ज्ञानविटा रचण्याचे काम ही सरावाने, मिळणाऱ्या संधीमुळे सहजतेने होऊ शकते. अशा प्रकारे इंग्रजी भाषा बोलायला शिकणे हा इंग्रजी भाषा येण्याचा खराखुरा अर्थ आहे!

## सारांश

थोडक्यात असे की, जेथे घरात किंवा परिसरात दोन भाषांचे वातावरण असते, तेथे मुले नैसर्गिकरित्याच दोनही भाषा 'पहिल्या भाषा' म्हणून आत्मसात करतील. परंतु जेथे एकाच भाषेचे वातावरण असते, तीच 'पहिली' भाषा असते तिथे तिच्या समृद्धीवर लक्ष पुरवावे. कारण, ती ज्ञानप्राप्तीची, विचारांची, भावनांची भाषा तर असतेच पण त्याचवेळी ती दुसरी भाषा शिकण्याची माध्यमभाषाही असते. मराठी मुलांनी आपली मराठी भाषा, मराठीतून शिकून समृद्ध केली तर तिच्या आधारे इंग्रजी भाषा शिकणे कठीण जाणार नाही. मात्र तिच्यातही, आधी ऐकणे, मग बोलणे आणि नंतरच वाचायला व लिहायला शिकणे, असा क्रम असावा लागेल.

रमेश पानसे
प्राज्ञपाठशाळा, ३१४, गंगापुरी, वाई, जि. सातारा ४१२८०३.

देणगी मूल्य : रु. २०/-